माझ्या लाडक्या हुशार पोरांनो!

तुम्ही या आधीही प्रत्येक वेळी जास्तीत जास्त अभ्यास करून चांगल्या गुणांनी पास होण्यासाठी प्रयत्न केले असतील. परंतु तुम्ही ठाम असा निश्चय-विचार मात्र केला नसेल. परंतु यार्षी मात्र जर का असा काही ठराविक नि चय करून मार्कांचं उद्धिष्ट ठरवलं आणि त्यानुसार तुम्ही आखणी करून जीव तोडून अभ्यास केला तर माझी खात्री आहे की अशा प्रकारे कोणतंही ध्येय साध्य केले जाऊ शकतं, त्यासाठी, जिद्द, ठाम विश्वास आणि नियाजनबद्ध कृती मात्र करावी लागेल!

मित्रांनो, अजूनही वेळ गेलेली नाही, आज नव्हे आताच एका कागदावर छानपैकी तुमचं नाव, ध्येयप्रतिज्ञा, कोणत्या विषयात किती मार्क मिळवायचेत ते ध्येय मोठ्या अक्षरांमध्ये लिहा व तुम्हाला नेहमी दिसेल अशा ठिकाणी लावा. एवढे केले तर त्याचे अतिशय सकारात्मक व आनंददायी परीणाम तुम्हाला आजपासून ते परीक्षां दरम्यान व निकालाच्या दिवशी बघायला मिळतील.

मित्रांनो, **"आपले विचार आपली कृती ठरवतात आणि आपली कृतीच आपलं भविष्य ठरवते"**
हे अगदी खरं आहे! आपली ध्येप्रतिज्ञा अशाचप्रकारे आपल्याला चांगले विचार देण्याचं काम करते. अनेकदा आपण नकारात्मक विचार करायला लागतो. उदाहरण द्यायचे झाले तर आपण स्वत:ची अशी समजूत करून घेतो की आपण इतरांपेक्षा कमी हुशार आहोत, आपली स्मरणशक्ती तेवढी चांगली नाही. एकदा का अशा विचारांनी आपल्या मनावर ताबा घेतला की आपलं अभ्यासावर लक्ष लागत नाही, मनासारखा अभ्यास होत नाही आणि मग आधीचा नकारात्मक विचार अजून जास्त पॉवरफूल होतो. असं हे अतिशय दुष्ट चक्र सुरू होतं आणि या भोवऱ्यात आपण अडकतो.

त्याऐवजी आपण असा विचार केला की आपल्यातही निसर्गाने सारखीच विचारशक्ती दिली आहे फक्त तीचा वापर कसा करावा हे आपल्याला कळत नाहीए किंवा आपण तिचा वापरच करीत नाहीए. या विचारातूनच मग नविन कृतीचा जन्म होतो, आपण आपली अभ्यासाची पद्धत शोधायला लागतो. त्यात आपल्याला हळु-हळु यश यायला लागतं आणि त्याचा परीणाम आपल्याला अभ्यासामध्ये दिसायला लागतो. अशाप्रकारे आपण चांगला अभ्यासात करण्यात यशस्वी झालो तर त्याचे परीणाम स्वरूप आपण परीक्षेमध्ये चांगली कामगिरी करतो आणि परीक्षेमध्ये चांगली कामगिरी केली तर आपण पास होऊन आपलं पुढील भविष्य उज्ज्वल होतं. गंमत म्हणजे हे सुद्धा एक चक्रच आहे नाही का? म्हणूनच मनामध्ये नेहमी होकारात्मक विचारांनाच येऊ द्या.

मित्रांनो, कोणतीही गोष्ट मिळवण्यासाठी प्रयत्न करावे लागतात, कष्ट घ्यावे लागतात आणि अभ्यास-परीक्षातरी त्याला अपवाद कशा असतील? कोणतंही काम करतांना सुरूवातीला ते कठिणच वाटतं. पण कामाला सुरूवात केली की आपल्याला मार्ग दिसू लागतात. आपण आपलं अभ्यासाचं-परीक्षेचं ध्येय ठरवल्यावर ते साध्य करण्याच्या प्रयत्नाला आपण लागतो. काही विषय आपल्याला कठिण वाटत असतील तर आपण ते समजून घेण्यासाठी वेगवेगळया मार्गांचा अवलंब करतो. आता सुद्धा तुम्हाला या संदर्भातील अडचणी असतील तर न लाजता व जरासुद्धा वेळ न दवडता तुमच्या मित्राची किंवा शिक्षकांची मदत घ्या. तुमची तळमळ बघून तुम्हाला कोणीही मदत करायला तयार होईल. इतर काही अडचणी असतील तर त्यासाठीही तुम्ही मदत मागा. आपल्या प्रत्येक पत्राच्या शेवटी हेल्प-लाईन नंबर दिलाय हवं तर त्यावर कॉल करा व आपली अडचण सोडवून घ्या. अडचण काहीही असो त्यावर मात करून मार्ग काढायची तयारी ठेवा. असं केलं तर निम्मी लढाई तुम्ही परीक्षेच्या आधीच जिंकलात म्हणून समजा! थोडक्यात काय तर जीवनात यशस्वी होण्यासाठी, चांगली नोकरी, चांगलं शिक्षण घेणं गरजेचं आहे आणि त्यासाठी चांगला अभ्यास करणंही तितकंच आवश्यक आहे. हे करीत असताना अडचणी-संकटं आली तर त्यावर मात करून सातत्याने वाटचाल केली तर काहीच अशक्य नाही. योग्य वेळी मनातल्या शंकांचं निरसन झालं तर त्याचा खूप चांगला फायदा होतो असा माझा अनुभव आहे. तेव्हा शंका असल्यास जरूर कॉल करा. बेस्ट ऑफ लक! खूप-खूप शुभेच्छा! तुमचा लाडका, **भारूकाका** मो. 86523 40256 www.bharukaka.com